# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

प्रत्र क्र. रासेयो/४२२/२०१२—२०१३
दिनांक :— २७/०८/२०१२.

प्रति,
प्राचार्य,
................................
................................
................................

संदर्भ:— ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रत्र क्रमांक:—व्हीपीएम२०११/प्र.क्र.१९९/पंरा—४,दिनांक:२५ जुलै,२०१२.

विषय:— पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेअंतर्गत महाविद्यालय रोपवाटिका तयार करणेबाबत.

मा. महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भ पत्रानुसार महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राज्यातील गावांचा शाश्वत विकास घडवून आणण्याकरीता ग्रामोथ्थान अभियान सुरु करण्यात आलेले आहे. पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करुन समृध्द व संपन्न गांवाची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे म्हणून शासनाने पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना सन २०१०—२०११ मध्ये सुरु केली. या योजनेत पर्यावरण समतोल राखण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा विकास करणे व त्यासाठी लोकसहभाग मिळवणे, पर्यावरणाचे भान ठेऊन भौतिक सुविधा उपलब्ध करणे व इको व्हिलेजची संकल्पना राबवून समृध्द ग्राम निर्माण करणे.

मुंबई विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना एककानी स्वयंसेवका मार्फत आतापर्यत अनेक शासकीय उपक्रमात उत्तम कार्य केले आहे. वृक्षलागवड, स्वच्छता अभियान, व्यसनमुक्ती, वनराई बंधारे इत्यादी अनेक कार्यक्रम यशस्वी करण्यात राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकानी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला आहे. वृक्षलागवड हे पर्यावरण संतुलनाचे अविभाज्य अंग असल्याने राज्यात मोठया प्रमाणावर वृक्षलागवड करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या सहभागाची आवश्यकता आहे. या करिता प्रत्येक महाविद्यालयात रोपवाटीका तयार करण्यासाठी विद्यार्थ्याना प्रोत्साहन करण्यासाठी तसेच वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन या उपक्रमात संक्रिय सहभाग घेण्यासाठी ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन या विभागामार्फत सुचना देण्यात आल्या आहेत.

तरी आपणांस विंनती करण्यात येते की, वरील प्रकाराचा उपक्रम महाविद्यालय अंतर्गत राबवून या उपक्रमात सक्रिय सहभाग दयावा ही विंनती

धन्यवाद !

आपला विश्वासु

प्रा. अतुल हं. सांळुके
प्रभारी कार्यक्रम समन्वयक, रासेयो विभाग